**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
**Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.278, www.srjis.com**
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, APRIL-MAY, 2022, VOL-10/51

# शिक्षणात बोलींचे उपयोजन

**शाम रणदिवे**

*सहाय्यक प्राध्यापक, ज्ञानगंगा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे-51*

**Paper Received On:** 25 MAY 2022
**Peer Reviewed On:** 31 MAY 2022
**Published On:** 1 JUNE 2022

***Abstract***

*शिक्षण प्रक्रियेमध्ये भाषेला खूप महत्त्व आहे. ज्ञानदानाची व ज्ञान संपादनाची प्रक्रिया भाषेद्वारेच होत असते. आपण विचारही भाषेच्या साहाय्यानेच करीत असतो. भाषा वापरून केलेला विचार म्हणजे मनातल्या मनात बोलणेच असते.(Thinking is Silent Speech) आपल्या मनातील विचार, भावना, कल्पना भाषेद्वारेच आपण व्यक्त करीत असतो. भाषा विचार करण्याचे, संवाद साधण्याचे, अध्ययनाचे प्रमुख साधन आहे. भाषेमुळे मस्तिष्काचा विकास होतो. मुळात भाषा हा शब्द संस्कृत धातू 'भाष्' या पासून तयार झालेला आहे त्याचा अर्थ बोलणे असा आहे. प्रमुख भाषांबरोबर अनेक बोलीही बोलल्या जातात. महाराष्ट्राची मराठी भाषा असली तरी महाराष्ट्रात सर्व ठिकाणी मराठी भाषा सारखी बोलली जात नाही.वेगवेगळ्या प्रदेशानुसार, स्थानानुसार, भौगोलिक रचनेनुसार मराठी भाषेच्या रूपात काही प्रमाणात बदल व वेगळेपणा दिसून येतो. एकाच भाषेतील बदलास दिसून येणाऱ्या वेगळेपणास बोली म्हटले जाते.*

***की वर्ड:*** *बोली, कार्यात्मक व्याख्या*

***Scholarly Research Journal's** is licensed Based on a work at **www.srjis.com***

## बोली

दैनंदिन जीवनात एकमेकांना बोलण्यासाठी व संवाद साधण्यासाठी दैनंदिन व्यवहारात सहजपणे व सुलभपणे वापरले जाणारे भाषेचे नैसर्गिक रूप म्हणजे बोली.

## प्रस्तावना

कोणत्याही भाषेच्या बोली मुख्य भाषेस समृद्ध करतात. बोलीमधून खऱ्या अर्थाने लोकजीवनाचे प्रतिबिंब दिसून येते. सहजता व नैसर्गिकपणा हे बोलीचे मुख्य वैशिष्ट्य असते. तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रसारामुळे व वापरामुळे ग्रामीण व शहरी जीवन पद्धतीतही बदल होत आहेत त्यामुळे त्यांच्या भाषा व बोलींमध्ये ही बदल होतात. आधुनिक जीवनशैलीमुळे बोलीतील काही शब्द नष्ट होत आहेत त्यामुळे कित्येक बोली नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. बोलींचा ऱ्हास होणे, बोली नष्ट होणे म्हणजे त्या विशिष्ट

भाषा संपुष्टात येण्यासारखे असते असे मत अनेक भाषातज्ञ व्यक्त करतात. बोली समाजाचा वैभवशाली वारसा असते. संस्कृती संक्रमण व संवर्धनाचे काम बोली करीत असतात. मोठ्या प्रमाणात लोकसाहित्य हे बोलीभाषेतून मौखिक स्वरूपातच निर्माण झालेले असते, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक स्वरूपात संक्रमित होत असते. सण-समारंभ, रूढी, परंपरा, प्रथा, लोककला यामधूनही आपल्याला बोलींचे वेगळेपण दिसून येते. भाषेत दिसून येणारे वाक्प्रचार, म्हणी बोलींमुळेच रूढ झालेले असतात.

**दर बारा कोसावर बदलते वाणी**

**बदलते पाणी**

या म्हणीनुसार भाषा तीच असली तरी स्वरभेदावरून, उच्चार प्रक्रियावरून, लकबीवरून, विशिष्ट शब्द योजनेवरून मूळ भाषेत काही प्रमाणात बदल होतो. मूळ भाषेच्या बदललेल्या रूपास बोली म्हटले जाते. प्रदेशानुसार मराठीच्या अहिराणी, खानदेशी, वऱ्हाडी नागपुरी मराठवाडी या व यांसारख्या अनेक बोली दिसून येतात.

“ एक भाषक समाजाच्या एका गटाकडून किंवा एक भाषक समाजाच्या एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकांकडून देवाण घेवाणीसाठी दैनंदिन व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट भाषिक रुपास बोली असे म्हणता येईल”.

डॉ. दत्तात्रेय पुंडे

**बोलीची वैशिष्ट्ये**

◆ मौखिक परंपरा
◆ सहजता, स्वाभाविकता
◆ जीवंतपणा
◆ समाजाच्या जगण्याशी एकरूपता
◆ प्रवाहित्त्व
◆ सांस्कृतिकता
◆ मुक्त व मोकळेपणा
◆ व्यक्त होण्याच्या शैलीतील वेगळेपणा
◆ आपलेपणा व गोडवा

**शिक्षणात बोलींची गरज**

◆ शाळेतील विद्यार्थ्यांची मातृभाषा, त्यांची बोलीभाषा शालेय भाषा, प्रमाणभाषा याबाबत विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम असतो.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

◆ बऱ्याचदा विद्यार्थ्यांनी ठराविक विषयाची दिलेली उत्तरे, त्यांनी मांडलेली मते शिक्षकांनाही लवकर समजत नाहीत कारण विद्यार्थ्यांची भाषिक पार्श्वभूमी भिन्न-भिन्न असते.

◆ विद्यार्थ्यांची भाषिक पार्श्वभूमी भिन्न-भिन्न असूनही अभ्यासक्रम व पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तके प्रमाणभाषेत असतात व शिक्षकही प्रमाण भाषेचा आग्रह धरतात.

◆ प्रमाण भाषेचा आग्रह व विद्यार्थ्यांची भिन्न-भिन्न भाषिक पार्श्वभूमी यातील संघर्ष यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययनात गोडी वाटत नाही.

◆ भाषेच्या पाठ्यपुस्तकांमधून जाणीवपूर्वक दिलेल्या प्रादेशिक बोली, भाषेतील पाठांची उद्दिष्टे त्यांच्या अध्यापनाचे हेतू लक्षात घेऊन अशा पाठाचे अध्यापन शिक्षक चांगल्या प्रकारे करु शकतील.

◆ आदिवासी भागातील मुलांमध्ये शैक्षणिक प्रगती घडवून आणण्यासाठी.

◆ विद्यार्थ्यांचा समतोल बौद्धिक विकास करण्यासाठी.

◆ समाजाच्या सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्यासाठी.

◆ सर्व विद्यार्थ्यांना आत्म प्रकटीकरण व संवाद कौशल्याची संधी मिळवून देण्यासाठी.

◆ आदिवासी वंचित बहुजन भटक्या जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी.

**शिक्षणात बोलींचे महत्व**

◆ शिक्षणात योग्यप्रमाणात बोलींचा वापर केल्यामुळे वंचितांच्या व आदिवासींच्या धोक्यातआलेल्या बोलीभाषांचे जतन होईल.

◆ स्वतःच्या भाषेबाबतचा न्यूनगंड व कमीपणा दूर होईल.

◆ मुलांच्या घरची भाषा, परिसरातील भाषा यांच्यातील अंतर कमी होईल त्यामुळे विद्यार्थी आनंदाने शिक्षण प्रक्रियेमध्ये सहभागी होतील.

◆ शिक्षणात बोलींचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांना आशय समजण्यास सुलभ होईल व त्यांचे ज्ञान समृद्ध होईल.

◆ बोली भाषांच्या वापरामुळे विद्यार्थी त्यांच्या मनातील विचार, भावना, कल्पना सुलभतेने मांडू शकतील यामुळे त्यांचा भावनिक विकास चांगल्याप्रकारे घडून येईल.

◆ शिक्षणात गरजेनुसार बोलींच्या वापरामुळे विद्यार्थ्यांच्या शब्द संपत्तीमध्ये वाढ होते त्यामुळे त्यांना आशयाचे आकलन चांगल्या प्रकारे होऊन, उच्च पातळीवरील तार्किक विचार क्षमता
( Higher order thinking) यांना उत्तेजन मिळते.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

◆ बोलींच्या वापरामुळे शैक्षणिक दर्जा सुधारतो, गुणवत्ता वाढते, विद्यार्थी शिक्षण प्रक्रियेत सहभागी होतात व त्यांचा आत्मसन्मान वाढीस लागतो.

◆ बोलींच्या वापरामुळे धार्मिक, राजकीय, सामाजिक संघर्ष कमी होऊन समाजात ऐक्याची भावना वाढीस लागते.

◆ बोलींच्या वापरामुळे विद्यार्थ्यांच्या भाषा शिक्षणाचा पाया भक्कम होऊन विद्यार्थी अन्य भाषा शिकण्यासाठी तयार होतात.

◆ बोलींच्या वापरामुळे लोकशाही टिकून राहते.

**शिक्षणात बोलींच्या वापरासाठी उपाय योजना**

◆ शिक्षकांनी भाषा शुद्ध अशुद्धतेचा विचार डोक्यातून काढून टाकावा.

◆ कोणतीही भाषा किंवा बोली शुद्ध अशुद्धतेच्या पलीकडे संवादाचे प्रमुख माध्यम असते याबाबत जागरूकता करावी.

◆ बोलींचा वापर करणाऱ्यांना कमी दर्जाचे लेखू नये.

◆ अध्ययन व संवाद प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांनी गरजेनुसार बोलींचा वापर करण्यासाठी शिक्षकांनी प्रोत्साहित करावे.

◆ मुलांच्या बोलीभाषांचा शाळेत स्वीकार होऊन बोलींचा संवादामध्ये वापर करताना विद्यार्थ्यांचा अपमान होणार नाही याची खबरदारी शिक्षकांनी घ्यावी.

◆ बोलीभाषेतील शब्दांना, वाक्यांना प्रमाण भाषेतील शब्द व वाक्यांचा पर्याय शिक्षकांनी विद्यार्थ्यांपुढे ठेवावा त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रमाण भाषेतून शिक्षण घेताना भीती वाटणार नाही.

◆ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वभाषेत व्यक्त होण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

◆ शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या परिसर भाषेबाबत थोड्याफार प्रमाणात तरी माहिती करून घ्यावी त्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांबरोबर त्यांच्या परिसर भाषेतून संवाद साधता येईल.

◆ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गरजेनुसार बोलींच्या वापराबाबत परवानगी दिल्यामुळे शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण होईल.

◆ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बोलीभाषेतील व प्रमाण भाषेतील सूक्ष्म साम्य भेद समजून सांगावेत.

◆ बोली भाषा व प्रमाण भाषा वापरताना विद्यार्थ्यांच्या उच्चार व लेखनात काय त्रुटी काय चुका होतात हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

◆ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना हळूहळू टप्प्याटप्प्याने घरच्या भाषेकडून शालेय प्रमाण भाषेकडे वळवावे त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात शालेय भाषेबाबत व अभ्यासाबाबत आत्मविश्वास निर्माण होईल.

◆ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बोलीभाषेतील साहित्याचा परिचय करून देऊन त्याचा आस्वाद घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

◆ शाळेमध्ये होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये बोली भाषेमधून असणाऱ्या लोककला, लोकनृत्य लोकगीते, विनोद यांसारख्या कला प्रकारांचा आवर्जून समावेश करावा.

◆ भाषेच्या पाठ्यपुस्तकांमध्ये प्रादेशिक बोलींमधून असणाऱ्या पाठांचे व कवितेचे अध्यापन करताना बोली भाषेतील शब्दांचे वेगळेपण विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे.

◆ बोलीभाषांचे सर्वेक्षण व जतन करणाऱ्या संस्थांची माहिती व्हावी म्हणून अशा ठिकाणी शैक्षणिक भेटींचे आयोजन करावे.

◆ स्व भाषेबाबत न्यूनगंड न बाळगता बोलीभाषांचा वापर करून त्यांच्या क्षेत्रात यशस्वी झालेल्या व्यक्तींची उदाहरणे विद्यार्थ्यांपुढे ठेवावीत.

## संदर्भ


*Asubels, D. (1968).Educational Psychology: A Cognitive View, Holt, Rinehart and winston Publication.*

*Akmajian, A. (2010).Linguistics: Introduction to language and communication. (6th ed.)*

*Ambridge, B. and Lieven, E.V.M.(2011). Language Acquisition Contrasting therotical approaches . Cambridge: Cambridge University Press.*

*Asubels, D. (1968).Educational Psychology: A Cognitive View, Holt, Rinehart and winston Publication.*

*G.O.I. (2014).Curriculum framework two year B.Ed. programme.NCTE, New Delhi.*

*G.O.I. (2020).Report of new education policy, New Delhi. Ministry of Education.*

*अकोलकर, ग.वि. आणि पाटणकर ना.वि., (1993). मराठीचे अध्यापन. पुणे. व्हीनस प्रकाशन.*

*अहेर, हि. (१९९५). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक , नागपूर : विद्या प्रकाशन.*

*पाटील, बी. , कागदे, एस. , कुऱ्हाडे, एस. आणि तोटे, क. (2016). भाषा, ज्ञान आणि अभ्यासक्रम (प्रथमावृत्ती ). निराली प्रकाशन.*

*पुंडे, द. दि.(1996) सुलभ भाषाविज्ञान(प्रथमावृत्ती). स्नेहवर्धन प्रकाशन.*

*पांडे, अ. आणि हरी वि. (२०१८). बहुभाषिकता : गुवत्तापूर्ण शिक्षणाचा पाया (प्रथमावृत्ती). युनिक अकॅडमी पब्लिकेशन.*